आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१६ एप्रिल २०२६ - गुरूवार

**ठळक बातम्या**

- संसदेच्या विस्तारित अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तीन दिवसीय विशेष सत्राला प्रारंभ

- राज्यसभेत नवनिर्वाचित १६ सदस्यांचा शपथविधी

- राज्य विधान परिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर/ १२ मे रोजी मतदान

- राष्ट्रपतींच्या उपस्थितीत वर्ध्याच्या हिंदी विद्यापीठाचा दीक्षांत सोहळा संपन्न

**आणि**

- मुंबईसह बहुतांश जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट जारी

**<><><><>**

महिला आरक्षण विषयक विधेयकासाठी संसदेच्या विस्तारित अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तीन दिवसीय विशेष सत्राला आज प्रारंभ झाला. सभागृहात अबू हासेम खान चौधरी, मोहसिना किडवाई आणि हरी नारायण राजभर तसंच दिवंगत गायिका आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहण्यात आली आणि त्यानंतर कामकाजाला सुरुवात झाली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ‘केंद्रशासित प्रदेश’ (सुधारणा) विधेयक २०२६ प्रस्ताव लोकसभेत सादर केला. विधी आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी संविधानाची १३०वी दुरुस्ती विधेयक तसंच, मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मांडण्याचा प्रस्ताव लोकसभेत सादर केला. हा प्रस्ताव २०७ विरुद्ध १२६ मतांनी मंजूर झाला. महिलांसाठी आरक्षण निश्चित करताना २०११च्या जनगणनेनुसार लोकसंख्येच्या प्रमाणात लोकसभेतल्या जागांची संख्या वाढवून ८१५ करण्याची तरतूद या विधेयकांमधे आहे. या विधेयकांमुळे देशाच्या संघराज्य रचनेला धक्का पोहोचेल, असा आरोप करत काँग्रेसचे खासदार के. सी. वेणुगोपाल यांनी ही विधेयकं सादर करायला विरोध केला. मात्र, वेणुगोपाल हे विधेयक सादर करण्यावर केवळ तांत्रिक आक्षेप घेऊ शकतात, परंतु विधेयकांच्या गुणवत्तेवर बोलू शकत नाहीत, असं प्रत्युत्तर गृहमंत्री अमित शहा यांनी दिलं. आधी जनगणना होणं गरजेचं आहे, असं सांगताना ही विधेयकं इतक्या तातडीने आणण्याची गरज काय, असा प्रश्न समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनी उपस्थित केला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी लोकसभेत या विषयावरच्या चर्चेत बोलत आहेत.

राज्यसभेत आज विनोद तावडे, नितीन नबीन, अभिषेक मनु सिंघवी, तेराश गोवाल्ला, जोगेन मोहन, प्रमोद बोरो, लक्ष्मी वर्मा, शिवेश कुमार, रामनाथ ठाकूर, उपेंद्र कुशवाह, अनुराग शर्मा, संजय भाटिया, करमवीर सिंग बौध, फुलो देवी नेतम, या नवनिर्वाचित सदस्यांनी शपथ घेतली. विनोद तावडे यांनी मराठीत शपथ घेतली.

**- - होल्ड..बाईट - विनोद तावडे - - -**

राज्यसभेत आज तालिका सदस्यांची फेरनिवड झाली. ही नियुक्ती १५ एप्रिलपासून लागू झाली आहे. यात भाजपचे दिनेश शर्मा, एस. फांगनोन कोन्याक आणि घनश्याम तिवारी, काँग्रेसच्या फुलो देवी नेतम, अण्णा द्रमुकचे एम. तंबीदुराई आणि बिजू जनता दलाचे सस्मित पात्रा यांचा समावेश आहे. यानंतर राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

विद्यापीठ अनुदान आयोगानं देशभरातली विद्यापीठं आणि महाविद्यालयांमध्ये नारी शक्ती वंदन अधिनियमाबद्दल जनजागृती करणारे कार्यक्रम आयोजित केले आहेत. लिंगभाव समानता, संवैधानिक मूल्य तसंच निर्णय प्रक्रियेत महिलांना समान प्रतिनिधित्व या मुद्द्यांवर संवाद घडवून आणण्याच्या दृष्टीनं देशभरातल्या सातशे सत्त्याहत्तर शैक्षणिक संस्थांमध्ये आयोजित केलेल्या अशा कार्यक्रमांमध्ये सुमारे १ लाख जण सहभागी झाले होते.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज ऑस्ट्रीयाचे चॅन्सेलर डॉ क्रिस्तियन स्टॉकर यांच्याशी प्रतिनिधीमंडळ स्तरावर चर्चा केली. स्टॉकर यांच्या भेटीमुळे गुंतवणूक आणि व्यापार क्षेत्रात भारत ऑस्ट्रीया संबंधांना नवी ऊर्जा मिळेल असं प्रधानमंत्री मोदी यांनी नंतर संयुक्त निवेदनात सांगितलं.

**<><><><><>**

राज्य विधानपरिषदेच्या ९ जागांसाठी १२ मे रोजी मतदान होणार असल्याचं निवडणूक आयोगाने आज जाहीर केलं. भारत निवडणूक आयोगाने आज विधानपरिषदेसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठीचा कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसार या निवडणुकीसाठी २३ ते ३० एप्रिल या कालावधीत उमेदवारी अर्ज भरता येतील. २ मे ला अर्जांची छाननी होईल, ४ मे पर्यंत अर्ज मागे घेता येतील. आणि १२ मे ला सकाळी ९ ते

दुपारी ४ या वेळेत मतदान होईल. विधानपरिषदेचे हे ९ सदस्य महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्यांकडून निवडले जाणार आहेत.

येत्या १३ मे ला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, विधानपरिषद उपसभापती नीलम गोऱ्हे, शशिकांत शिंदे, संजय केनेकर, संदीप जोशी, दादाराव केचे, अमोल मिटकरी, राजेश राठोड आणि रणजीतसिंह मोहिते हे सदस्य निवृत्त होत आहेत.

**<><><><>**

विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी हे स्वप्न तरुण विद्यार्थ्यांनी पाहणं आवश्यक आहे असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. वर्धा जिल्ह्यातल्या सेवाग्राम इथं महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाच्या ६व्या दीक्षांत समारंभात त्या बोलत होत्या....

**बाईट .. राष्ट्रपती**

गुणवंत विद्यार्थ्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते सुवर्णपदकं प्रदान करण्यात आली तर, एकूण आठ विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रमांत उत्कृष्ट कामगिरीबद्दल सन्मानित करण्यात आलं.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वर्ध्याचे पालकमंत्री पंकज भोयर आणि इतर मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज महात्मा गांधींच्या सेवाग्राम आश्रमाला भेट दिली. आदी निवास, बा कुटी, बापुकुटी, बापुंच्या कार्यालयाची पाहणी करुन त्यांनी माहिती घेतली. राष्ट्रपतींनी यावेळी प्रार्थना सभेत सहभाग घेतला, वृक्षारोपण केलं, तसंच सूत कताई केली.

**<><><><>**

भारतीय हवामानशास्त्र विभागानं मध्य महाराष्ट्र , मराठवाडा आणि विदर्भात आज आणि उद्या उष्णतेची लाट राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. मुंबईसह बहुतांश जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. आज कोकणात उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे.

मात्र शुक्रवारपासून उष्णतेच्या लाटेची परिस्थिती सुधारण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. राज्यात काही ठिकाणी हलका पाऊस आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे.

दरम्यान, हिंगोलीमध्ये काल एका तरुणाचा उष्माघातानं मृत्यू झाला.

**<><><><>**

मोसमी पाऊस यंदा सरासरीपेक्षा कमी होईल असा अंदाज हवामानविभागाने व्यक्त केल्याच्या पार्श्वभूमीवर मुंबईत पिण्याच्या पाण्याचं नियोजन करण्यासाठी येत्या १ मे पासून पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात करण्याचा महानगरपालिकेचा प्रस्ताव आहे. सध्या मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही धरणांमधे ३३ पूर्णांक ६ दशांश टक्के पाणीसाठा उपलब्ध असून तो येत्या ७ जुलै पर्यंत पुरेसा आहे, असं महानगरपालिका प्रशासनाने म्हटलं आहे.

<><><><><>

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत  मुंबई इंडियन्स संघाची गाठ आज पंजाब किंग्स संघाशी पडणार आहे. संध्याकाळी साडे सात वाजता मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर हा सामना सुरु होईल. मुंबई इंडियन्सनं आतापर्यंत यंदाच्या मोसमातले तीनही सामने गमावले आहेत तर पंजाब किंग्सनं अद्याप पराभव पाहिलेला नाही. गुणतालिकेत पंजाब तिसऱ्या तर मुंबई नवव्या पायरीवर आहे.

<><><><><>

नांदेड शहराच्या देगलूर नाका भागात खड्ड्यात साचलेल्या पाण्यात बुडून चार शाळकरी मुलांचा मृत्यू झाला. आज दुपारी बाराच्या सुमारास ही घटना घडली. महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी आणि पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून चौकशी सुरू आहे.

<><><><><>

नारी शक्ती वंदन अधिनियमच्या समर्थनार्थ' बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव इथं भारतीय जनता पार्टी च्या वतीने शहरात आज महिलांची रॅली काढण्यात आली.

//<><><><><>//